फोन केला असता त्यांनी ते तहसिलदार साहेबांच्या सोबत असल्याचे सांगितले व जेव्हा तहसिलदार साहेबांची शासकिय गाडी तहसिल कार्यालयात आली त्यावेळी सलील शेख हा तहसिलदार साहेबांच्या शासकिय गाडीतुनच खाली उतरला. त्यानंतर सलील शेख यांनी शिंदे यांचेकडुन फाईल घेवुन त्यावर सही आणण्यासाठी ते तहसिलदार श्री. चव्हाण साहेब यांचे कॅबिनमध्ये गेले.तहसिलदार यांनी सलील शेख हा खाजगी इसम असताना त्यास शासकिय वाहनात बसवुन तसेच कार्यालयीन काम करण्यास परवानगी देवुन अपप्रेरणा दिलेली आहे. तसेच लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सलील शेख यांचे वाहनाची तपासणी केली असता सदर वाहनात तहसिल कार्यालयातील तहसिलदार साहेबांच्या सहया असलेल्या महत्वाच्या कागदपत्रांच्या फाईल मिळुन आल्या. सलील यांचे मोबाईलमधील व्हॉट्सअॅप चेक केले असता त्यामध्ये सलील याने कार्यालयीन पत्रव्यवहार तहसिलदार यांचे व्हॉट्सअॅपवर पाठवुन तो बरोबर आहे का ते चेक करण्यास सांगितले असता त्यांनी बरोबर असल्याचे सांगितले आहे. यावरून तहसिलदार चव्हाण यांनी खाजगी इसम सलील शेख यांस तहसिल कार्यालयातील सुविधा पुरवुन, माझेकडे लाचेची मागणी करण्यास व स्विकारण्यास अपप्रेरणा व प्रोत्साहन दिले असल्याचे दिसुन येत असल्यामुळे माझी 1) आरोपी खाजगी इसम सलील करीम शेख, वय 38 वर्षे, व्यवसाय शेती, रा. लक्ष्मीनगर, ता.पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर, 2) लोकसेवक हरिष शिंदे, महसुल सहायक, वर्ग–3, तहसिल कार्यालय पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर, 3) लोकसेवक सारंग भिकुसिंग चव्हाण, वय 48 वर्षे, पद–तहसिलदार पैठण, वर्ग–1, रा. ए विंग, फ्लॅट नं 305, द प्राईड इग्निमा, फेज–1, सुतगिरणी चौक, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर यांचे विरुध्द माझी फिर्याद आहे.

समक्ष

(अजित त्रिपुटे)
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर**

( स्वप्नील सुरेश तांबे )

दि - 04.03.2025 रोजी
नों.नं 007
वेळ - 10:03 वाजता
गु.र.नं - 59/25 कलम - भ्र प्रं अधि - 1988
कलम - 7, 7(अ), 12 प्रमाणे

ई. की. नागरगोजे (पोउपनि)
**ठाणे अमलदार**
**पोलीस स्टेशन पैठण**

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

**प्रथम खबर अहवाल**

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** पैठण

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0059 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/03/2025 10:03

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 18/02/2025

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/03/2025

**Time From (वेळेपासून):** 16:11 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:52 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/03/2025 **Time (वेळ):** 09:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 007

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/03/2025 10:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 12 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पैठण व हिरडपुरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** स्वप्नील सुरेश तांबे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा हिरडपुरी, ,पैठण,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा हिरडपुरी, ,पैठण,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9665487828

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सलील करीम शेख | | | 1. लक्ष्मीनगर, ता पैठण,पैठण, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | हरिष शिंदे | | | 1. जि छत्रपती संभाजीनगर,पैठण, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 3 | सारंग भिकुसिंग चव्हाण | | | 1. ए विंग, फ्लट नं 305, द प्राईड, छत्रपती संभाजीनगर ,पैठण, औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ रुपये दराच्या 220 नोटा | 110,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

110,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 04/03/2025

मी स्वप्नील सुरेश तांबे, वय 32 वर्ष, धंदा-शेती व वाळू वाहतुक, रा. हिरडपुरी, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर. समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी दि. 17/02/2025 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे, ला.प्र.वि.अहिल्यानगर यांना फोनवर लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला दि.18/02/2025 रोजी 14.00 वा चे सुमारास पैठण येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. मी दि. 18/02/2025 रोजी त्या सुरक्षित ठिकाणी 15.00 वा पोहोचलो. पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे हे शासकीय वाहनासह तेथे हजर होते. त्यांनी मला माझे नाव गाव विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे पथक व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यानंतर मी शासकिय वाहनात बसलो. त्यावेळी श्री. त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पंचांनी मला माझी तक्रार विचारली असता मी लाचमागणीची तक्रार सांगितली की, ''मी मागील वर्षापासुन माती व वाळू वाहतुकीचा व्यवसाय करतो. माझे नावे हायवा एम एच 20 जीसी 7447 व ट्रॅक्टर एम एच 20 जीई 8449 अशी दोन वाहने आहेत. दि.06/02/2025 रोजी मी मौजे कावसान, ता.पैठण येथे वाळू वाहतुक करत असताना माझी वरील दोन्ही वाहने महसुल विभागाच्या पथकाने पकडली व दोन्ही वाहने तहसिल कार्यालय, पैठण येथे जमा केली. दि. 07/02/2025 रोजी तहसिलदार पैठण यांचेकडुन मला दंड भरणा करणेबाबत नोटीस बजावण्यात आली. सदर नोटीस प्रमाणे दंडाच्या रकमेचे चलन काढण्याकरीता मी दि.10/02/2025 रोजी तहसिल कार्यालय पैठण येथे महसुल शाखेतील कर्मचारी श्री. शिंदे यांचेकडे गेलो असता त्यांनी दंडाच्या रकमेचे चलन काढुन देण्याकरीता माझकडे 50,000/-रुपयांची मागणी केली. मी त्यांना ही दंडाची रक्कम आहे काय असे विचारले असता त्यांनी सदरची रक्कम ही दंडाची नाही, परंतु चलन काढायाचे असेल तर मला 50,000/-रुपये द्यावे लागतील, त्याशिवाय चलन मिळणार नाही, असे सांगितले. मी त्यांना दंडाव्यतिरिक्त एवढी रक्कम नाही देवु शकत असे म्हणालो असता त्यांनी 20,000/-रुपये आता दे व 30,000/-रुपये तहसिल कार्यालयाचा गाडी सोडण्याचा आदेश काढल्यानंतर दे, त्याशिवाय चलन मिळणार नाही असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजास्तव 20,000 /-रुपये दिले. त्यानंतर त्यांनी मला दंडाच्या रकमेचे चलन काढुन दिले. त्याप्रमाणे मी माझे हायवा गाडीचे रूपये 3,34,640/-रु. व ट्रॅक्टरचे 1,00,000/-रु दंडाची रक्कम चलनाव्दारे भरली. भरणा केलेल्या चलनाच्या पावत्या घेवुन मी शिंदे यांचेकडे गेलो. मी त्यांना चलनाच्या पावत्या, माझे वाहनांचे आरसीबुक, पॅनकार्ड, आधारकार्ड. कागदपत्रे दिली. शिंदे हे वाहने सोडण्याबाबतचा प्रस्ताव तयार करत असताना तेथे खाजगी इसम सलील शेख आले. सलील शेख हे नेहमी तहसिल कार्यालयात तहसिलदार यांचे सोबत असतात. तहसिलदार यांचे केबिनमध्ये त्यांची सतत ये-जा असते. तहसिलदार यांनी सांगितलेली तहसिल कार्यालयातील कामे खाजगी इसम सलील शेख हे करतात. सलील शेख यांनी शिंदे यांचेकडुन फाईल घेवुन त्यावर सही आणण्यासाठी तहसिलदार श्री. चव्हाण साहेब यांचे कॅबिनमध्ये गेले. थोडया वेळाने ते फाईल घेवुन बाहेर आले व मला म्हणाले की ''माझी व तहसिलदार श्री. चव्हाण साहेब यांची चांगली ओळख आहे, मला तुमच्या फाईलसंदर्भात व वाळू वाहतुकीबाबत सर्व माहिती आहे, तुमचे वाहन सोडण्याबाबतच्या प्रस्तावावर तहसिलदार साहेब यांची सही लागणार आहे. त्याकरीता तहसिलदार साहेबांना 2,00,000/-रुपये दयावे लागतील. '' असे म्हणाले व मला घेवुन तहसिलदार यांचे कॅबिनमध्ये गेले. तेथे तहसिलदार श्री. चव्हाण साहेब मला म्हणाले की, '' तुमच्या वाहन सोडण्याबाबतच्या प्रस्तावावर मी सही करून

पुढील आदेश होण्याकरीता उपविभागीय अधिकारी, महसुल, पैठण-फुलंब्री यांचेकडे पाठवितो. त्यांचा वाहने सोडण्याबाबतचा आदेश झाल्यानंतर तो आदेश घेवुन या. त्यानंतर तुमची वाहने घेवुन जा व मी सलीलकडे सांगितले आहे तेवढे 2,00,000/-रुपये सलीलकडे देवुन टाका.'' असे म्हणाले. त्यानंतर मी व सलील तहसिलदार यांच्या कॅबिनमधुन बाहेर आलो. सलील शेख यांनी तहसिलदार साहेबांना आता काहीतरी रक्कम दयावी लागेल, तरच ते प्रस्तावावर सही करतील असे मला सांगितले. मी त्यांना माझ्याकडे आता एवढे 2,00,000/-रुपये नाहीत असे म्हणालो असता सलील यांनी फोनपे वर काही पाठवा व काही कॅश दया असे म्हणाले. माझी वाहने सोडण्याकरीताच्या प्रस्तावावर तहसिलदार साहेब पैसे दिल्याशिवाय सही करणार नाहीत म्हणुन नाईलाजास्तव मी माझे फोन पे वरून सलील शेख यांनी दिलेल्या 9960577377 या नंबरवर 40,000/-रुपये पाठविले व 50,000/-रुपये सलील शेख यांना रोख स्वरूपात दिले. त्यावर सलील शेख यांनी मला उर्वरित 1,10,000/-रु. दिल्यानंतरच तुझी वाहने सोडली जातील असे म्हणाले. लोकसेवक शिंदे यांनी दंडाच्या रकमचे चलन काढुन देण्याकरीता माझेकडुन 50,000/-रुपयांची मागणी करून 20,000/-रु. रक्कम त्याच वेळेस स्विकारून उर्वरित 30,000/-रु. लाचेची मागणी केली आहे. तसेच महसुल विभागाने केलेल्या दंडाची संपुर्ण रक्कम मी चलनाव्दारे भरली असताना देखील वाहने सोडण्याबाबतच्या प्रस्तावावर सही करून तो प्रस्ताव प्रांत कार्यालयाकडे पाठविण्याच्या मोबदल्यात व प्रांत कार्यालयाचा वाहने सोडण्याबाबतचा आदेश झाल्यानंतर तहसिल कार्यालयातुन वाहने सोडण्याकरीता तहसिलदार चव्हाण साहेब व खाजगी इसम सलील शेख यांनी 2,00,000/-रुपये लाचेची मागणी करून सलील शेख यांनी त्यापैकी 50,000/-रु. रोख स्विकारून 40,000/-रुपये फोन पे व्दारे स्विकारले आहेत व उर्वरित 1,10,000/-रुपये लाचेची मागणी करत आहेत. तरी मला लोकसेवक शिंदे यांना 30,000/-रु. व तहसिलदार आणि सलील शेख यांना उर्वरित 1,10,000/- रूपये लाचेची रक्कम देण्याची ईच्छा नाही. दि. 16/02/2025 रोजी सलील शेख यांनी माझे वाहन सोडण्याबाबतच्या प्रस्तावावर तहसिलदार यांची सही घेवुन सदरचा प्रस्ताव माझेकडे दिला. सदरचा प्रस्ताव मी उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण फुलंब्री, मुख्यालय छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात जमा केला. आज दि.18/02/2025 रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, पैठण फुलंब्री, मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातुन माझी वर नमुद वाहने सोडण्याबाबतचा आदेश मला मिळाला आहे. तो आदेश घेवुन मी तहसिल कार्यालय, पैठण येथे जावुन खाजगी इसम सलील शेख यांची भेट घेणार आहे व माझी वाहने सोडण्याबाबत विनंती करणार आहे. त्यावेळी त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास मी त्यांना माझी तहसिलदार साहेबांशी भेट घालुन दया अशी विनंती करणार आहे. तहसिलदार साहेब यांचेशी भेट झाल्यानंतर मी त्यांचेशी माझी वाहने सोडण्याबाबत विनंती करणार आहे. त्यावेळी त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कारवाई करावी. तसेच मी शिंदे यांचीदेखील तहसिल कार्यालयात जावुन भेट घेणार आहे. त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द देखील कारवाई करावी. माझ्यात व तहसिल कार्यालयातील कर्मचारी शिंदे, खाजगी इसम सलील शेख आणि तहसिलदार श्री. चव्हाण साहेब यांचेत कुठल्याही प्रकारचा आर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार नाही. तसेच भांडणतंटा अगर वैर नाही. वगैरे मजकुराची तक्रार सांगीतली व ती माझे स्वहस्ताक्षरात लिहुन दिली त्यावर मी, श्री.त्रिपुटे साहेबांनी व दोन्ही पंचांनी सहया केल्या.

त्यानंतर मी नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. श्री. त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करून त्यामध्ये श्री.त्रिपुटे, दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर श्री.त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. श्री. त्रिपुटे यांनी मला व पंच नं. 1 यांना माझेकडील चारचाकी वाहनाने 16.11 वा. रवाना केले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे तहसिल कार्यालयात गेलो. त्याठिकाणी खाजगी इसम सलील शेख व तहसिलदार श्री. चव्हाण साहेब हे कार्यालयात नव्हते. तेव्हा मी सलील शेख यांना मोबाईलव्दारे फोन करून स्पिकर चालु केला व तहसिलला आलो होतो असे म्हणालो असता सलील शेख यांनी येवु राहिलो असे सांगितले. मी त्यांना साहेब जातील परत असे म्हणालो असता त्यांनी ते साहेबांच्या सोबतच आहेत असे सांगितले. त्यानंतर तहसिलच्या मेन गेटजवळ मला कर्मचारी शिंदे दिसले. मी त्यांचेजवळ जावुन त्यांचेकडे वाहन सोडण्याबाबतचा प्रांत कार्यालयाकडील आदेश दिला. मी व पंच नं. 1 शिंदे यांचेसह कार्यालयात गेलो. थोडया वेळाने मी व पंच नं.1 बाहेर आलो. मी माझ्या फोनचा स्पिकर चालु करून सलील शेख यांना फोन केला. त्यावेळी त्यांनी मला पेमेंटचे केल नाही का, एवढे मोठे काम केले आहे तुमचे, पटकन दया, एक दहा राहिलेतना असे म्हणाले. मी त्यांना साहेबांशी बोलणे करून दया, काही कमी करायला सांगा असे म्हणालो असता त्यांनी तुच रिक्वेस्ट कर, काम झाल्यावर अस म्हणता येत का, शब्दाला किंमत असते, तुझ्या शब्दावर रात्री

साहेबांच्या घरी जावुन नऊ वाजता सहया आणल्या, साहेबाला बोलायला लावु का परत....तुला साहेबांसमोर नेले होते मी असे म्हणाले. थोडया वेळाने तहसिलदार साहेब व सलील शेख हे तहसिलदार यांच्या शासकिय वाहनातुन तहसिल कार्यालयात आले. त्यांना शासकिय वाहनातुन उतरून कार्यालयात येताना मी व पंच नं. 1 यांनी पाहिले. मी थांबलो त्या ठिकाणी सलील शेख आले. त्यांनी मला पैसे घेवुन आला काय असे विचारले. त्यानंतर मी शिंदे यांचेकडे गेलो. त्यांनी मला '' तुमचं साहेबांशी काही बोलणं झाल आहे का काही, त्यामुळे फाईल थांबल्या आहेत काय, '' असे म्हणाले. तसेच शिंदे यांनी मला ''आज संध्याकाळी पाठवुन दया, काम थांबलेले आहे माझे'' असे म्हणुन जप्त केलेल्या गाडीतील वाळु त्यांचे घरी नेवुन टाकायला सांगितली. तसेच सलील शेख यांनी देखील शिंदे यांच्या घरी वाळु टाकायची सांगितली.

त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 18.46 वा. दरम्यान परत आलो. त्यावेळी पोकाँ निमसे यांनी माझेकडे दिलेले व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यावेळी पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंच क्र. 1 व मला घडलेल्या हकीकतीबाबत विचारले असता पंच क्र. 1 यांनी व मी वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. दरम्यान मला सलील शेख यांचा फोन आला व त्यांनी मला ''कुठे आहे, कधी येणार आहे'' असे विचारता मी त्यांना ''सर नव्हते, शुक्रवारी देतो सगळे'' असे सांगितले. त्यावर सलील शेख यांनी ''पन्नास दे, बाकी साठ शुक्रवारी दे'' असे म्हणाले.

त्यानंतर पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डींग मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता खाजगी इसम सलील शेख यांनी स्वतःकरीता व तहसिलदार चव्हाण यांचेकरीता 1,10,000/-रुपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे तसेच कर्मचारी शिंदे यांनी त्यांचे घरी वाळुची गाडी टाकण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. पुढील कारवाई शुक्रवार दि. 21/02/2025 रोजी आयोजित करण्याचे ठरले होते. परंतु तहसिलदार साहेब हे नांदेड येथे महसुल क्रिडा स्पर्धेकरीता गेले असल्याचे समजल्याने व क्रिडी स्पर्धा या दि. 21/02/2025 ते 23/02/2025 पावेतो या कालावधीत होणार असल्याने पुढील कारवाई दि. 24/02/2025 रोजी करण्याचे ठरले.

त्यानंतर दि. 24/02/2025 रोजी कर्मचारी शिंदे व तहसिलदार चव्हाण यांचेविरूध्द लाचमागणी पडताळणी कारवाई करण्याचे ठरले. श्री. त्रिपुटे साहेबांनी आम्हाला सर्व सुचना दिल्या. पोकाँ निमसे यांनी व्हाँईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर मला खाजगी इसम सलील शेख यांचा फोन आला व त्यांनी मला किती वेळ लागेल, तेवढे करून टाक असे म्हणाले. त्यानंतर फोन कट झाला. त्यानंतर माझे ताब्यात व्हाँईस रेकॉर्डर देवुन मला व पंच नं. 1 यांना कर्मचारी शिंदे व तहसिलदार चव्हाण यांची भेट घेण्याकरीता रवाना केले. त्याप्रमाणे आम्ही रवाना होवुन तहसिल कार्यालयात गेलो. तेथे मी शिंदे यांची भेट घेतली. त्यांनी मला तु वीस दिलेत, तुझे तीस राहिलेत, तीस हजारांचा बंदोबस्त कर असे म्हणुन माझ्याकडे 30,000/-रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर मला सलील शेख यांचा फोन आला. मी त्यांना तहसिलला या असे म्हणालो असता त्यांनी काय करू तहसिलला येवुन असे म्हणाले.आमचेत फोनवर थोडा वेळ चर्चा झाली. त्यानंतर तहसिलदार साहेब कार्यालयाचे बाहेर येवुन त्यांचे शासकिय वाहनात बसले. मी त्यांच्या जवळ जावुन त्यांना ''सर मी दादा तांबे, बाप्पुनी पाठवलं होतं असे म्हणालो. त्यावेळी तहसिलदार साहेबांनी,''तुझ काय आहे मग असे विचारले असता मी त्यांना म्हणालो की, '' तेवढं सलिम भाईला सहकार्य करायला सांगा असे म्हणालो असता त्यांनी मला येतो परत असे सांगितले व तेथुन त्यांच्या वाहनाने निघुन गेले. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे तेथुन निघुन रवाना केले त्या ठिकाणी परत आलो. पोकाँ निमसे यांनी व्हाँईस रेकॉर्डर बंद केले. श्री. त्रिपुटे साहेबांनी मला व पंच नं. 1 यांना घडलेल्या हकीकतीबाबत विचारले असता आम्ही वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर मी लघुशंकेकरीता गेलो असता मला सलील शेख यांचा पुन्हा फोन आला व ते मला म्हणाले की ''मी नसताना तु तहसिलदार साहेबांना का भेटला, तुला माझ्यावर विश्वास नाही का, तहसिलदार साहेबांचा मला फोन आला होता, ते मला शिव्या देत होते की दादा तांबे मला डायरेक्ट का भेटला म्हणुन, आता तु तुझे पाहुन घे...... आणि मी फोन करील तेव्हा पैसे घेवुन ये असे म्हणुन त्यांनी फोन कट केला. त्यानंतर थोडा वेळ वाट पाहुन सलील शेख यांना फोन केले असता त्यांनी फोन घेतले नाहीत. त्यामुळे पुढील कारवाई सलील शेख यांचा फोन आल्यानंतर करण्याचे ठरले.

मी दि. 25/02/2025 रोजी सलील शेख यांना फोन केले परंतु त्यांनी फोन घेतले नाही. दि. 27/02/2025 रोजी दुपारी मला सलील शेख यांचा फोन आला व त्यांनी मला पैसे घेवुन ये असे सांगितले. मी त्यांना बाहेर गावी आलो आहे, सोमवारी पैसे घेवुन येतो असे सांगितले असता सलील शेख यांनी सोमवारी येताना 1,10,000/-रु. असे सर्व पैसे घेवुन ये असे म्हणाले. सदरची हकीकत मी श्री.त्रिपुटे साहेब यांना सांगितली. त्यांनी मला सोमवार दि. 03/03/2025 रोजी लाचेच्या रकमेसह 11.00 वा. दरम्यान पैठण येथील सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले.

मी दि. 03/03/2025 रोजी 11.00 वा. दरम्यान पैठण येथील सुरक्षित ठिकाणी येवुन थांबलो. तेथे श्री.त्रिपुटे व

पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर असे सांगितले. श्री. त्रिपुटे यांनी लाचेच्या नोटांच्या नंबरची खात्री केली. त्यानंतर श्री. त्रिपुटे यांनी मला थोडे बाजुला बाहेर उभे राहण्यास सांगीतले, माझे बांधकामातील एका खोलीत त्यांच्या तपासण्या केल्या. त्यानंतर मला बोलवुन माझ्या हाताच्या व पॅन्टच्या खिशाच्या तपासण्या करण्यात आल्या. त्यावेळी सलील शेख यानी मी हे पैसे तहसिलदार साहेबांकरीता घेतले आहेत. मी त्यांना फोन लावुन तुमची खात्री करून देतो असे सांगितल्याने सलील शेख यांचे मोबाईलवरून तहसिलदार साहेब यांना तीन वेळा फोन करण्यात आला. त्यांचे फोनवरील संभाषण रेकॉर्ड करण्यात आले.

त्यानंतर सलील शेख यांना ताब्यात घेवुन श्री. त्रिपुटे व सापळा पथक पैठण येथील श्रीकृष्ण लॉजिंग येथे आले. त्यांचेपाठोपाठ मी देखील तेथे आलो. थोडया वेळाने सापळा पथकाच्या मदतीने तहसिलदार चव्हाण साहेब यांना सदर ठिकाणी आणण्यात आले. त्यांना श्री. त्रिपुटे यांनी पुर्ण नाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव सारंग भिकुसिंग चव्हाण, वय 48 वर्ष, पद-तहसिलदार पैठण, वर्ग-1, रा. ए विंग, फ्लॅट नं 305, द प्राईड इग्रिमा, फेज-1, सुतगिरणी चैक, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर असे सांगितले. त्यानंतर श्री. त्रिपुटे यांनी सापळा पथकास कर्मचारी शिंदे यांचा शोध घेण्यास सांगितले.सदर ठिकाणी श्री.त्रिपुटे व सापळा पथकाने पुढील पंचनाम्याचे कामकाज केले.

तरी दिनांक 18/02/2025 रोजी लाचमागणी पडताळणीच्या वेळी 16.11 ते 18.46 वा. दरम्यान तहसिलदार श्री.चव्हाण यांचे तहसिल कार्यालयातील काम करणारे खाजगी इसम सलील शेख यांनी माझ्याकडे माझे तहसिल कार्यालयात जप्त असलेले वाळू वाहतुकीची दोन वाहने सोडण्याकरीता स्वतःकरीता व तहसिलदार चव्हाण यांचेकरीता 1,10,000/-रुपयांची लाच मागणी करुन सदर लाच रक्कम सलील शेख यांनी दि.03/03/2025 रोजी 15.49 ते 16.52 वा. दरम्यान हिरडपुरी येथील माझे गाळयाच्या बांधकामाच्या ठिकाणी स्विकारली आहे. लोकसेवक हरिष शिंदे यांनी दि. 18/02/2025 रोजी माझे जप्त केलेल्या वाहनातील वाळु त्यांचे घरी टाकण्याचे सांगितल्याने त्यांनी माझेकडे वस्तुच्या स्वरूपात लाचेची मागणी केली असुन दि. 24/02/2025 रोजी 12.10 ते 14.35 वा. दरम्यान माझेकडे 30,000/-रुपये लाचेची मागणी केली आहे. तसेच तहसिलदार श्री. चव्हाण यांनी दि. 16/02/2025 रोजी माझे वाहने सोडण्याबाबतचा प्रस्ताव सही करून प्रांत कार्यालयाकडे पाठविण्याकरीता सलील शेख यांचे ताब्यात दिला. दि. 18/02/2025 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान मी सलील शेख यांना फोन केला असता त्यांनी ते तहसिलदार साहेबांच्या सोबत असल्याचे सांगितले व जेव्हा तहसिलदार साहेबांची शासकिय गाडी तहसिल कार्यालयात आली त्यावेळी सलील शेख हा तहसिलदार साहेबांच्या शासकिय गाडीतुनच खाली उतरला.त्यानंतर सलील शेख यांनी शिंदे यांचेकडुन फाईल घेवुन त्यावर सही आणन्यासाठी ते तहसीलदार श्री. चव्हाण साहेब यांचे कॉबिनमध्ये गेले तहसीलदार यांनी सलील शेख हा खाजगी इसम असतांना त्यास शासकीय वाहनात बसुन तसेच कार्यालयातील काम करण्यास परवानगी देवुन अपप्रेरणा दिलेली आहे.तसेच लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सलील शेख यांचे वाहनाची तपासणी केली असता सदर वाहनात तहसिल कार्यालयातील तहसिलदार साहेबांच्या सहया असलेल्या महत्वाच्या कागदपत्रांच्या फाईल मिळुन आल्या. सलील यांचे मोबाईलमधील व्हॉट्सअँप चेक केले असता त्यामध्ये सलील याने कार्यालयीन पत्रव्यवहार तहसिलदार यांचे व्हॉट्सअँपवर पाठवुन तो बरोबर आहे का ते चेक करण्यास सांगितले असता त्यांनी बरोबर असल्याचे सांगितले आहे. यावरून तहसिलदार चव्हाण यांनी खाजगी इसम सलील शेख यांस तहसिल कार्यालयातील सुविधा पुरवुन, माझेकडे लाचेची मागणी करण्यास व स्विकारण्यास अपप्रेरणा व प्रोत्साहन दिले असल्याचे दिसुन येत असल्यामुळे माझी 1) आरोपी खाजगी इसम सलील करीम शेख, वय 38 वर्ष, व्यवसाय शेती, रा. लक्ष्मीनगर, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर, 2) लोकसेवक हरिष शिंदे, महसुल सहायक, वर्ग-3, तहसिल कार्यालय पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर, 3) लोकसेवक सारंग भिकुसिंग चव्हाण, वय 48 वर्ष, पद-तहसिलदार पैठण, वर्ग-1, रा. ए विंग, फ्लॅट नं 305, द प्राईड इग्रिमा, फेज-1, सुतगिरणी चैक, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर यांचे विरुध्द माझी फिर्याद आहे.

समक्ष ( स्वप्नील सुरेष तांबे )